महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/ प्र. क्र. १११/ पोल-३, दिनांक २४/०३/२०२६

**विषय** :- ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांना त्यांचे दिनांक ०१.०६.२०२५ ते ३१.०८. २०२५ कालावधीत केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१११/पोल-३, दिनांक २४/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२४१८२९४०२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-03-2026 17:27:08

(चंद्रशेखर शिंदे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)(अति कार्यभार),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १७

प्रत,

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहायक पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांना त्यांचे दि.१.६.२०२५ ते दि.३१.८.२०२५ कालावधीत केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. : संकीर्ण ३६२५/प्र.क्र.१११/पोल-३
गृह विभाग, दुसरा मजला,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४.३.२०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.गृह विभाग क्र.सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.१.२०२४ व दि.९.४.२०२५.
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.५.७.२०२३, दि.९.१०.२०२३. दि.३०.९.२०२४.
३) शासन पत्र गृह विभाग क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/पोल-३,दि.६.२.२०२४ व दि.१७.५.२०२४
४) सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-८१४२८३/पोल-३,दि.२६.११.२०२४, व दि.२२.९.२०२५
५) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र. पोमसं/१७/ठाणे शहर CCTV प्रकल्प/२८/२०२१, दि.१८.९.२०२५.
६) मे.पीडब्ल्युसी कं. मुंबई यांचे देयक दि.२.९.२०२५.
७) शासन निर्णय क्र.गृह विभाग क्र.सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-८१४२८३/पोल-३, दि.४.२.२०२५ (मुदतवाढ)
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५

प्रस्तावना :-

मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दि.२४.७.२०११ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार मुंबई शहर व राज्यात इतरत्र सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय प्रक्रीया सुलभ करण्यासाठी दि.२७.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समिती" (High Power Committee) स्थापन करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सुरक्षा विषयक उपाययोजना करण्याकरिता आवश्यक ते सर्व निर्णय घेण्यासाठी सदर समितीला प्राधिकृत करण्यात आले. तथापि, तत्कालीन मुख्य सचिव यांच्या सुचनेनुसार गृह विभाग शासन निर्णय दि.४.८.२०१७ अन्वये गृह विभागातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत एकसुत्रता राहावी म्हणून विविध शहरात सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचा विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये नागरीकीकरणामुळे, औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्ह्यांमध्ये वाढ होत असलेली वाढ, यांचा विचार करुन "सुरक्षित शहर" ही संकल्पना राबविताना "सीसीटीव्ही यंत्रणा" बसविणे ही बाब महत्वाची ठरते.

राज्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री व निधी उपलब्धता विचारात घेऊन गृह विभागाने प्राधान्यक्रम धोरणाप्रमाणे ठाणे शहराचा समावेश केला आहे.

३. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी दि.२०.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मे. पीडब्ल्युसी, मुंबई यांना त्यांचे Project milestone -Final Bid Evaluation Report Submission कामाचे देयक रु.६२,०९,१६०/- (जीएसटीसह) अदा करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच दि.१८.२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प सल्लागारांचे दि.१६.१०.२०२४ ते ३१.१.२०२५ या कालावधीचे सेवाशुल्क देयक रु.७२,१०,६३८/- (जीएसटीसह) अदा करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच दि.३०.७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे दि.१.२.२०२५ ते ३१.५.२०२५ या कालावधीचे सेवाशुल्क देयक रु.८२,७८,८८०/- (जीएसटीसह) अशा तिन्ही देयकांच्या एकूण रु.२,१६,९८,६७८/- (जीएसटीसह) अदा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये “ठाणे पोलीस आयुक्तालयाने केलेल्या सादरीकरणातील मुद्यांच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration) ४ व ५ मध्ये वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.४९२,८९,४१,१६७/-एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने अंतिम मान्यता दिली. त्यानुसार ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा “मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२ यंत्रसामुग्री साधनसामुग्री ” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा असे उक्त नमूद दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. तदनंतर दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रु.५७५,८७,८१,३६२/- (जीएसटीसह) इतक्या खर्चाच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

४. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीचा प्रकल्प प्रभावीपणे राबविणेकरिता प्रकल्प सल्लागाराची RFP तयार करण्यापासून ते GO LIVE होईपर्यंत आवश्यकता असल्याने त्यांच्या शुल्काची तरतूद सविस्तर प्रकल्प अहवाल DPR प्रकल्प खर्चामध्ये Project Cost करण्यात आलेली आहे असे अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी त्यांच्या दि.२१.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार गृह विभाग, शासन पत्र दि.६.२.२०२४ व दि.१७.५.२०२४ अन्वये पीडब्ल्युसी कंपनीला Work Order देण्यात आली आहे. दि.४.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प करिता १ मुख्य सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार, २ सहयोगी सल्लागार असे एकूण ५ सल्लागारांना दि.१६.१०.२०२४ ते दि.१५.१.२०२६ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प सल्लागारांचे मानधनाची देयके अदा करणेबाबत दि.२६.११.२०२४ अन्वये रु.२०,६९,७२०/- इतका व दि.२२.९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २,१६,९८,६७८/- इतका निधी असा एकूण रु.२,३७,६८,३९८/- रुपयांची दि.३१.५.२०२५ अखेरची देयके अदा केलेली आहेत.

५. परि.३ व ४ मध्ये नमूद केल्यानुसार ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. (PWC), Mumbai यांची १.६.२०२५ ते ३१.८.२०२५ या कालावधीतील देयके अदा करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने त्यांच्या दि.१८.९.२०२५ रोजीच्या पत्रांद्वारे विनंती केल्यानुसार एकूण रु.५३,९४,९६०/- इतकी रक्कम अदा करण्याची बाब विचाराधिन होती. त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

"अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी दि.१८.९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मे. पीडब्ल्युसी, मुंबई यांना त्यांचे जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत केलेल्या त्यांचे Project Implementation Phase कामाचे देयक रु.५३,९४,९६०/-(जीएसटीसह) अदा करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| Month | Resource Name | Billing Designation | Man Month Rate for the mentioned period | Deployment % | Applicable Amount per Resource for the mentioned period | Total Applicable Amount | GST @ 18% | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E | F = D * E | G | H = 18% of G | I = G + H |
| June 2025 | Manikanth Venkataraman | Principal Consultant | 4,54,000 | 100% | 4,54,000 | 17,54,000 | 3,15,720 | 20,69,720 |
| | Kedar Sane | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | | | |
| | Parag Khopkar | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Jay Chaudhari | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Pratik Thakare | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| July 2025 | Kedar Sane | Principal Consultant | 4,54,000 | 100% | 4,54,000 | 14,09,000 | 2,53,620 | 16,62,620 |
| | Parag Khopkar | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | | | |
| | Jay Chaudhari | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Pratik Thakare | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| August 2025 | Kedar Sane | Principal Consultant | 4,54,000 | 100% | 4,54,000 | 14,09,000 | 2,53,620 | 16,62,620 |
| | Parag Khopkar | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | | | |
| | Jay Chaudhari | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Pratik Thakare | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| **Total** | | | | | | **45,72,000** | **8,22,960** | **53,94,960** |

२. उपरोक्त प्रस्तावित खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत १३-कार्यालयीन" या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा,व तो सन २०२५-२६ वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ व दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली असून सदर प्रकल्पांचा निधी कोषागारातून आहरित

करण्यासाठी पोलीस महासंचालक, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून तसेच त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्रस्तुत देयकांची रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करावीत.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५ अनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या निधी वितरणास वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१९९/२०२६, व्यय-७, दि.११.३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२४१८२९४०३२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.24 18:30:39 +05'30'

**(रा.ता.भालवणे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस आयुक्त, ठाणे.

३. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.

**प्रत,**

१. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (व्यय-७ / विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती / पोल-३.